
# भारतीय सण-उत्सव

भाग २

डॉ. भाग्यश्री कुलकर्णी



परी प्रकाशन

भारतीय सण–उत्सव
भाग २

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १४०/–

## अनुक्रमणिका

१. नवरात्र ........ ३
२. विजयादशमी–दसरा ........ १९
३. बसुबारस आणि धनत्रयोदशी ........ ३८
४. नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन ........ ५७
५. बलिप्रतिपदा – पाडवा ........ ७६
६. भाऊबीज ........ ९५
७. तुळशीविवाह ........ ११४
८. मकरसंक्रांत ........ १३२
९. महाशिवरात्र ........ १५३
१०. होलिकात्सव ........ १७३



# नवरात्र

'नाविन्यध्यास' तरुण मंडळातील लहान–मोठी मुले एकत्र जमलेली होती. दर वर्षी गणेशोत्सव ते मोठ्या प्रमाणात आनंदात आणि उत्साहात साजरा करीत होते. यावर्षीच्या गणेशोत्सवात वर्गणी दुप्पट करूनही फारशी खळखळ न करता प्रत्येकाने ती दिली होती. वर्गणी देणाऱ्यांना माहीत होतं की मंडळ या पैशातून कार्यकर्त्यांना कपडे, हॉटेलिंग, फटाके यासारख्या गोष्टीवर पैसा खर्च न करता ते त्या पैशातून नक्कीच चांगले, नाविन्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणार.

तसं नाविन्यध्यास हे मंडळ प्रत्येक वर्षी काहीतरी आगळं–वेगळं करायचं. सबंध कॉलनी त्यांच्या उपक्रमात सामील होत असे. या मंडळाचं आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे ते लहान मुलांच्याकडून कार्यक्रम करवून घेत. मंडळाच्या कार्यकर्त्यांची पुढची फळी तयार करण्याचा त्यांचा प्रमुख उद्देश होता. अशा या मंडळाची मुले एकत्र जमली होती. शेवटी काहीतरी ठरवून मुलं पांगली. पार्थ घरी आला. त्याने आईला मंडळाचा ठरलेला कार्यक्रम सांगितला.

तो म्हणाला, ''आई, मंडळानं असं ठरवलंय की, या वर्षी नवरात्रीत जो गरबा खेळला जातो तो नुसताच धांगडधिंगा असतो म्हणून गरबा नृत्य आयोजित न करता काहीतरी आगळं–वेगळं करायचं.''

''काय करणार आहे मंडळ ?''

''ते सांगतो, पण तू आधी आर्याला स्पर्धेची तयारी करायला सांग. मी तिचं स्पर्धेसाठी नाव दिलंय. आर्या... ए आर्या... इकडं ये आधी.''

''काय रे पार्थदादा ?'' आर्यानं बाहेर येत विचारलं.

''स्पर्धेची तयारी करायला लाग. मी तुझं नाव दिलंय.'' पार्थनं सांगितलं.

''अरे, पण विषय तरी कळू दे ना.'' आर्या म्हणाली.

''सांगतो की. आई, या वर्षी मंडळानं नवीन उपक्रम करायचं ठरवलंय. गरबा नृत्याला पूर्णपणे फाटा दिलाय....''

''ओ नो, मी नवीन स्टेप्स् बसवल्या होत्या. काय रे हे दादा ? माझा सगळा मूडच गेला.'' आर्या नाराजीच्या स्वरात म्हणाली.

''मूड जायला काय झालं ? बारा-एकपर्यंत रिमिक्स गाण्यावर नुसत्या टिपऱ्यांनी ठेका धरायचा. दररोज एक नवीन चुनरी-घागरा घालायचा आणि मिरवायचं नुसतं...''

''आम्हा मुलींना नको काही नावं ठेवायला. तुम्ही मुलं पण असता की आमच्यासोबत रंगीबेरंगी आणि चमकदार कुडता-पायजमा घालून नाचायला. ते नाही सांगत.''

''बरं बाई, आम्ही मुलं पण असतो. आईसारख्या मोठ्या बायकाही आपले अवजड देह सांभाळीत फेर धरीत असतात; पण यावर्षी हे काही नाही.''

''पार्थ, तू स्पर्धेचा विषय तरी सांग.'' आईनं मध्येच विचारलं.

''या वर्षी साडेतीन शक्तिपीठांची माहिती स्पर्धकांद्वारे दिली जाणार आहे.''

''म्हणजे फक्त साडेतीनच स्पर्धक ?'' आर्यानं विचारलं.

''कितीहीजण या स्पर्धेत भाग घेऊ शकतील; पण स्टेजवर मात्र साडेतीन शक्तिपीठांची माहिती सांगणाऱ्या चारच स्पर्धकांचा समावेश असेल.''

''ते चौघे स्पर्धक कसे ठरवणार ?''

''हस्तलिखित अशी माहिती मंडळाकडे आठ दिवसात जमा करायची. त्यातून फक्त चारच स्पर्धक निवडले जाणार आहेत. त्यांनी भाषणं करायची.''

''म्हणजे मला खूप तयारी करायला हवी. दादा, तू मला इंटरनेटवरून माहिती काढून देशील का ?'' आर्यानं विचारलं.

''हो. सगळी तयारी करून देतो. मी तिथं सांगून आलोय की, कार्यकर्त्याची बहीण म्हणून तिची निवड तर होणार नाहीच; पण तिच्या स्वत:च्या तयारीवर तिला स्पर्धक म्हणून निवडलं जाईल.''

''होय की रे. कार्यकर्त्यांच्यावर शब्द येईल की मग कसं केलंत...''

''अगं, जे भाग घेतील ना त्यांनी आपल्या हस्तलिखितावर नाव, पत्ता, वय, वर्ग लिहायचा नाही. त्यासाठी एका बंद पेटीत की ज्याची किल्ली आपल्या कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक जोगकाका यांच्याकडे दिलेली असेल. तर त्या पेटीत स्वहस्ताक्षरात एक परिच्छेद लिहून त्यावर इतर माहिती लिहून तो कागद टाकायचा. निवडलेले हस्तलिखित नंतर जोगकाका त्या हस्ताक्षराशी

जुळवून  स्पर्धक निवडतील. कुणाची तक्रार असल्यास त्याचे निवारण केले जाईल.'' पार्थने सांगितलं.

''दादा, तू राजकारणात जाणार बहुतेक. कसा सांगतोस !'' आर्या कौतुकानं हसत म्हणाली.

''बरं. तू जा तयारीला लाग. मलाही तयारी करायची आहे.''

''तुला ? तू कशात भाग घेतलायस ? आणि कार्यकर्त्यांनी भाग घ्यायचा नसतो ना ?'' आर्यानं विचारलं.

''नाही गं बाई. स्पर्धेत नाही घेतलाय; पण नवरात्र सणाची माहिती सांगण्याची जबाबदारी मंडळाने माझ्यावर टाकलीय. त्याचीच तयारी करायचीय.'' पार्थ झटकन उठत म्हणाला.

''पार्थ, खरंच आर्या म्हणते त्यात तथ्य आहे बरं. तुझी भाषा किती मोठ्या माणसांसारखी प्रौढ झालीय. कुणी म्हणेल का तुला तेरा–चौदा वर्षांचा पोरबुद्धीचा !'' आई म्हणाली.

''अगं, मंडळात सारखं ऐकून ऐकून तसंच बोलायची सवय लागलीय. तो सोहन माहीत आहे ना तुला तुळपुळ्यांचा. तो गरबाबद्दल माहिती देणार आहे. आम्ही तिघं–चौघं कॅफेत जाऊन जरा माहिती गोळा करून येणार आहे.'' पार्थ म्हणाला.

''आणि पार्थ, आमच्यासाठी काहीच नाही का कार्यक्रम ? आमच्यासाठी कुठली स्पर्धा...?''



''नाही. या वर्षी तुम्ही मोठे सगळे प्रेक्षक, श्रोते. आम्ही सात वर्षांपासून पंधरा वर्षांपर्यंत मुला–मुलींसाठी स्पर्धा ठेवल्या आहेत.''

''आई, तू आपल्या कॉलनीच्या शेजारच्या कॉलनीत होणाऱ्या गरबात नाव नोंदव आणि माझंसुद्धा नोंदव बरं. आपल्या मंडळाचे कार्यक्रम काय दिवसाच असणार.'' आर्यानं सुचवलं.

''काहीही झालं तरी नाचायचं काही सोडू नका तुम्ही माय–लेकी.'' वैतागाने पार्थ म्हणाला.

''हो बाबा तुझ्यासारखे आणि तुझ्याइतके मोठे आम्ही कुठे आहोत. तुम्हीच आम्हाला चार शहाणपणाच्या गोष्टी सांगणार आणि आम्हीच ऐकणार.'' आई म्हणाली.

''आई, तू मला चिडवू नकोस हं सांगून ठेवतो.'' पार्थ रागावून म्हणाला.

''आर्या, दादाला चिडवायचं असतं का ? काही समजत नाही का तुला ? आपल्या मंडळाचा सच्चा कार्यकर्ता आहे म्हटलं तो. नको बरं चिडवू त्याला. पार्थ, बाळा मला सांग हं तू कुणी तुला चिडवलं तर.'' आई गंभीर आवाजात बोलत होती.

''मी जातोच कसा. आर्या, तू लायब्ररीत जाऊन माहिती गोळा कर. आधी कुठल्या शक्तिपीठावर बोलणार आहेस ते आईला विचारून ठरव. मग मी पण तुला मदत करतो.''

''जशी आज्ञा महाराज.'' आर्या म्हणाली आणि आई व ती दोघीही हसल्या.

✦

मंडळाच्या मंदिरासमोरचा सभामंडप गच्च भरलेला होता. संयोजकांनी अतिशय सुंदर संयोजन केलेलं होतं. मंदिरामध्ये दुर्गेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याऐवजी सुंदर असे घट स्थापन केले होते. टपोऱ्या झेंडूच्या माळेने ते घट सुंदर दिसत होते. कॉलनीतील लोकांच्यासाठी खुर्च्या भाड्याने आणल्या होत्या. स्टेजही भाड्याने आणले होते. स्टेजवर पाच–सहा खुर्च्या, दोन एकमेकांना जोडलेली टेबलं ठेवलेली होती. टेबलावर तांब्या–भांडं ठेवलेलं होतं. जोगकाका स्टेजवर आले आणि त्यांनी माईक हातात घेऊन बोलायला सुरुवात केली.

''उपस्थित माता–भगिनींनो आणि मित्रांनो, आज जे आपण इथं जमलेलो आहोत ते नाविन्यध्यास मंडळाने आयोजित केलेल्या आगळ्या–वेगळ्या कार्यक्रमानिमित्ताने. साडेतीन शक्तिपिठांसाठी आम्ही चार स्पर्धक निवडलेले आहेत. त्यांची नावे याप्रमाणे – सौजन्या, रूद्रट, आर्या आणि सुरभी. खरं तर खूप हस्तलिखिते प्राप्त झाली. ऐनवेळी आम्ही स्पर्धेचं स्वरूप बदललं. स्वत:ला पीठ समजून त्या स्वरूपात शक्तिपीठांची माहिती उपस्थितांना द्यावी हा विचार समोर आला. स्वरूप बदलूनही खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यातील हे चार स्पर्धक निवडले गेले. रूद्रट हा मुलगा असूनही त्याने लिहिलेली माहिती चांगली होती. त्यामुळे त्याला आम्ही संधी दिलेली आहे. या कार्यक्रमात सूत्रसंचालन याला फाटा दिला असल्याने आता स्पर्धकांनी स्टेजवर येऊन आपले नाव सांगून विषयाला सुरुवात करावी. कुंजली, पार्थ आणि सोहन यांनी मध्ये येऊन आपली भाषणं द्यायची आहेत. मी माझे चार शब्द संपवितो. जयहिंद !''

''माझं नाव आर्या. मी देवीच्या साडेतीन पीठांपैकी एका पीठाची माहिती सादर करणार आहे.

मी कोल्हापूरची महालक्ष्मी. देवीच्या साडेतीन शक्तीपीठातील एक पूर्ण पीठ. महाराष्ट्रातील जागृत असे देवस्थान. चालुक्य राजानं सातव्या शतकास माझ्या देवालयाची उभारणी करण्यास प्रारंभ केला. पुढे नवव्या शतकात शिलाहार यादव राजांनी माझे मंदिर हेमाड पद्धतीनं बांधलं.



माझं मंदिर हे संपूर्ण दगडी असून त्यावर सुंदर नक्षीकाम आणि विविध देवदेवतांच्या मूर्त्या आहेत. माझ्या या मंदिराला चार दरवाजे असून पश्चिम दिशेला महाद्वार आहे. देवीच्या समोर उभे राहिल्यावर डाव्या बाजूला घाटी दरवाजा आहे. या घाटी दरवाजावर मोठी घंटा आहे. तिचा आवाज सर्व शहरभर निनादतो. माझ्या मंदिरात असंख्य कोरीव शिल्पे कोरलेले खांब आहे. ते मोजू नयेत कारण ते इतके आहेत की मोजता येणंच अशक्य आहे.

नऊ ते बारा नोव्हेंबर आणि एकतीस जानेवारी ते दोन फेब्रुवारी या दिवशी माझ्या मुखावर, शरीरावर आणि पायावर सूर्यकिरणे पडतात. त्यावेळी गाभारा सूर्यकिरणांनी उजळून निघतो. तेव्हा माझी आरती करतात. अरे, हो पण मी कशी आहे ते अजून तुम्हाला सांगितलंच नाही.

माझी मूर्ती ही वालुकामय पाषाणाची आहे. माझं वजन चाळीस किलो आहे. मला चार हात असून दोन्ही हातात गदा व ढाल तर खालच्या दोन हातात महाळुंग म्हणजे मातुलिंग आणि पानपात्र आहे. माझी उंची तीन फूट आहे. माझ्या डोक्यावर शेषशाई नागाने फणा धरून छाया निर्माण केली आहे. माझ्या मागे माझे वाहन सिंह आहे. माझ्या गाभाऱ्यापुढे इ.स. १८३८ मध्ये बांधलेला भव्य असा गरुड मंडप आहे.

मी कोल्हापुरात कशी आले याची कथा तुम्हाला थोडक्यात सांगते. एकदा सर्व देवतांमध्ये सर्वात कोणता देव श्रेष्ठ याची परीक्षा घेण्याचे काम भृगू ऋषींच्याकडे सोपविण्यात आले. भृगू ऋषी जेव्हा इतर देवांच्याकडून विष्णूकडे आले तेव्हा प्रभू शेषाच्या आसनावर निद्रा घेत होते. ते पाहून भृगू ऋषी संतापले आणि त्यांनी प्रभूच्या छातीवर लत्ताप्रहर केला. तेव्हा प्रभूंनी न रागवता त्यांना ‘आपल्या पायाला इजा तर झाली नाही ना ?’ असा प्रश्न केला.

याचा मला खूप राग आला. मला हा प्रभूंचा अपमान वाटला म्हणून मी तडक कोल्हापूरला आले आणि इथेच राहू लागले. अनेक कुटुंबियांचे कुलदैवत मी असल्यानं असंख्य भाविक लोक

माझ्या दर्शनासाठी येतात. अलीकडे तर तिरुपतीचं दर्शन सहज होऊ लागल्यामुळं माझ्या दर्शनाला येणाऱ्यांची संख्या अधिकच वाढलेली आहे. दर शुक्रवारी माझी पालखी निघते. फुटाणे आणि कुंकू प्रसाद म्हणून असतो. शुक्रवार आणि मंगळवार या दिवशी माझ्या मंदिरात श्रद्धाळू खूप दूरवरून येतात.

नवरात्रामध्ये नऊ दिवस मला विविध वेशभूषेत सजवतात. दररोज वेगळी पूजा आणि वेगवेगळ्या वाहनात मला बसवलेले असते. नऊ दिवसात अनेक भाविक रांगा लावून माझं दर्शन घेतात. रात्री पालखी काढली जाते. त्यावेळी प्रचंड गर्दी असते. विजयादशमीला मी सीमोल्लंघनाला दसरा चौकात सोनं लुटायला जाते. त्रिपुरा पौर्णिमेला माझ्या मंदिरावर सगळीकडे दीप लावले जातात. तेव्हा सगळा परिसर दीपज्योतींनी उजळून जातो. अशी मी कोल्हापूरची महालक्ष्मी. मनोभावे माझी भक्ती केली तर मी माझ्या भक्तांच्या सगळ्या मनोकामना पूर्ण करते. मग काय माझ्या दर्शनाला येणार ना तुम्ही ? लवकरच या आणि शांतपणे दर्शन घ्या. समाधानाने तुमचे काम करा. माझे आशीर्वाद आहेतच तुमच्या मागे.''

''नमस्कार. मी रूद्रट. मी तुळजापूरच्या शक्तीपीठाची माहिती देत आहे.

कृतयुगामध्ये एक ऋषी होते. त्यांचे नाव कर्दम आणि त्यांच्या पत्नीचे अनुभूती. अनुभूती ही रूपगर्विता, सौंदर्यवती होती. कर्दम ऋषींचे निधन झाल्यावर ती आपल्या मुलांसह मंदाकिनी नदीच्या काठी एका आश्रमात राहू लागली. एकदा कुकूर नावाच्या दुष्ट दैत्याने तिला पाहिले. या दैत्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी अनुभूतीने देवीचा धावा केला. त्यावेळी देवीने त्या दैत्याला मारले. अनुभूतीच्या विनंतीवरून देवीने तिथेच कायम राहायचे ठरवले. ते ठिकाण म्हणजे तुळजापूर.

खरं तर माझ्या या तुळजापूरचं पूर्वीचं नाव होतं चिंचपूर. अनुभूतीने देवीचा धावा केला आणि देवीने त्वरेने धाव घेतली. म्हणून भाविकांनी त्वरिता हे नाव ठेवलं. त्वरिताचं तुरजा आणि पुढे त्याचंच तुळजा असं नाव झालं.

तुळजापूर हे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात आहे. माझे हे मंदिर गावाच्या पश्चिमेला असून देवळात प्रवेश करताना महाद्वार लागते. माझ्या या मंदिराच्या आसपास खूप तीर्थे आहेत. सुरुवातीला जे तीर्थ लागतं ते सर्व तीर्थांच्या कोलाहलातून निर्माण झालेलं आहे म्हणून त्याचं नाव आहे कल्लोळ तीर्थ. या तीर्थात स्नान करून भाविक प्रसन्नचित्ताने पुढे जातात.

गौतमाच्या पापनाशासाठी मंकावती नावाचं किंवा त्यालाच कोण कोण विष्णूतीर्थ म्हणतात. हे एक प्रचंड मोठे असे तीर्थ आहे. पापनाशी हे तीर्थ इंद्राने केलेल्या वृत्रासुखधाच्या पापातून मुक्तता होण्यासाठी निर्माण झालेले आहे. याशिवाय एका दरीत एक तीर्थ आहे त्याला नागझरी

म्हणतात. नागराज वासुकी याने अहिरावणाने हिरावून घेतलेले आपले राज्य परत मिळावे म्हणून याच ठिकाणी तपश्चर्या केलेली होती. त्याचे राज्य त्याला परत मिळाले. वासुकीच्या मनातली इच्छा पूर्ण झाली म्हणून तेथे असणाऱ्या तीर्थाला मनोकामना किंवा मनकामना तीर्थ असं म्हणतात.

माझे मंदिर हे हेमाडपंथी पद्धतीचे आहे. ते पूर्वाभिमुख आहे. सभामंडप, गूढमंडप आणि गाभारा असे तीन भाग माझ्या मंदिराचे आहेत. माझी मूर्ती ही काळ्या शाळीग्राम शिळेची आहे. मला आठ हात आहेत. मी महिषासूरमर्दिनी असल्यामुळं माझ्या एका हातात महिषासूर राक्षसाचे मस्तक धरलेले आहे.

अश्विन शुद्ध प्रतिपदा ते पौर्णिमा या काळात माझ्या नावाची यात्रा भरते. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गोंधळी, जोगते, माझ्या दर्शनासाठी आणि माझ्यासमोर गोंधळ घालण्यासाठी येतात. हळदी-कुंकू, पीठ, मीठ, तेल मला अर्पण करून भोपी हातात दिवट्या घेऊन नाचतात. गोंधळी सर्व देवांना बोलवून गोंधळाला येण्याचे आवाहन करतो. संबळ नावाचे वाद्य माझ्यासमोर वाजवले जाते. खूप पाहण्यासारखे ते दृश्य असते.

नवरात्रामध्ये मला नवनवीन वस्त्रांनी आणि सुवर्णालंकारांनी सजवलं जातं. माझ्यासमोर मंदिरात भजनं, भारूडं, गोंधळ इत्यादी कार्यक्रम केले जातात. काही भाविक नवस फेडण्यासाठी, माझे दर्शन घ्यायला येतात. अशी मी तुळजापूरची भवानी. एक पूर्ण शक्तीपीठ. माझ्याच आशीर्वादामुळं शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापण्याची प्रेरणा मिळाली. म्हणून तर वीर वृत्तीची प्रेरणा देणारी अशी मी तुळजापूरची भवानी माता आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून मला खूप मान आहे. मग येणार ना माझ्या दर्शनाला ?''

✦

''नमस्कार, मी सुरभी. मी आपल्याला साडेतीन पीठातील पूर्ण पीठ माहूरगडवासिनी रेणुकादेवीची माहिती देणार आहे.

मी रेणुकादेवी. माझ्या पतीचे नाव जमदग्नी. भृगू वंशातील ऋचिक ऋषी आणि गाधिराजाची मुलगी सत्यवती यांचा मुलगा जमदग्नी. मी सूर्यवंशातली. माझ्या वडिलांचे नाव रेणू आणि आईचे भोगवंती. मला समण्वान, सुषेण, वसुमान, विश्ववसू आणि राम म्हणजे पुढे त्याला परशुराम म्हणून ओळखू लागले तो असे पाच पुत्र. परशुरामाचे माझ्यावर आणि आपल्या वडिलांच्यावर अतिशय प्रेम -वडिलांच्या आज्ञेचा तो कधीही भंग करीत नसे.

एकदा मी पाण्याला गेले होते तेव्हा मला यायला खूप उशीर झाला. पाणवठ्यावरील दृश्यांनी मला मोहित केले होते. म्हणून मला वेळ झाला होता; परंतु परशुरामच्या वडिलांना माझा अतिशय

राग आला. त्यांनी प्रत्येक मुलाला आज्ञा केली की, माझा शिरच्छेद त्यांनी करावा; पण माझ्या चारही मुलांनी त्यांची आज्ञा पाळली नाही. तेव्हा संतापाने त्या चारही मुलांना त्यांनी भस्मसात केले. शेवटी परशुरामाला आज्ञा केली आणि त्याने आज्ञेचे पालन केले.

मुलाने आपली आज्ञा ऐकली याचा आनंद त्याच्या पित्याला झाला. त्यांनी मुलाला म्हणजे परशुरामाला वर मागायला सांगितला. माझ्यावर आणि त्याच्या भावंडांवर निस्सीम प्रेम असल्यानं परशुरामानं मला आणि भावंडांना वराच्या सहाय्याने जिवंत केलं. अशी मी रेणुका माता. मी परशुरामची आई असल्यामुळे माहूरला मातापूर असेही म्हणतात.

माझे वास्तव्य नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यामध्ये असणाऱ्या माहूर गावात आहे. माझेच नाव एकवीरा आहे. एकवीरा म्हणून मी कार्ल्याला, अमरावतीला असते. यल्लमा म्हणूनही मी कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातील सौंदत्तीमध्ये वास करते.

माहूर येथील माझ्या मंदिराच्या आवारात यज्ञकुंड आहे. तसेच पिंपळाच्या झाडाखाली जमदग्नीचे शिवलिंग आहे. मंदिराच्या परिसरात सती अनुसया, कालिका अशा अनेक देवदेवतांची मंदिरे आहे.

माझ्या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे गाभाऱ्यात माझी मूर्ती नाही तर फक्त माझ्या मस्तकाचाच भाग आहे. हे मस्तक जवळजवळ पाच फूट उंचीचे आहे. माझ्या कपाळावर ओंकार काढलेला असून, कानात रत्नजडित बुगड्या आणि रत्नजडित मुकुट डोक्यावर आहे. डोळे मोठे आणि तेजस्वी असून मी रत्नजडित सिंहासनावर विराजमान झालेली आहे. माझ्या मुखात विडा ठेवलेला आहे. पानांचा विडा आणि पेढा मला नैवेद्य म्हणून दाखविण्यात येतो आणि प्रसाद म्हणूनही विडाच भक्तांना दिला जातो. नवरात्रीच्या उत्सवात असंख्य भाविक माझ्या दर्शनाला येतात. अशी मी माहूरची रेणुका.''

✦

''नमस्कार, मी सौजन्या. मी सर्वात छोटी असल्यानं मी साडेतीन शक्तीपीठांपैकी शेवटच्या अर्ध्या पीठाची माहिती देणार आहे. या अर्ध्या पीठाच्या देवीचं नाव आहे सप्तशृंग गडावरची सप्तशृंगी.

नाशिक जिल्ह्यात कळवण तालुक्यातील वणी येथे एक पर्वत आहे. या पर्वताला सात शिखरे आहेत. या सात शिखरांपैकी मधल्या कड्यावर अठरा ते एकोणीस फूट उंचीच्या कपारीत माझे मंदिर आहे. माझी मूर्ती आठ-नऊ फूट उंचीची आहे. मला अठरा भुजा असून प्रत्येक भुजेमध्ये एकेक अस्त्र मी घेतलेले आहे. ती जर सांगायचीच झाली तर उजवीकडून खालून वर मी धारण केलेले आहे मणिमाळ, कमळ, बाण, तलवार, वज्र, गदा चक्र, त्रिशूळ, परशू आणि डावीकडून वरून खाली शंख, घंटा, पाश, शक्ती, दंड, ढाल. धनुष्य, पानपत्र आणि कमंडलू.